**नियमीत दिवाणी मुकदमा नं. १९/२०१३ मधील निशाण नं. १०७ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी तर्फे दाखल करण्यात आलेला असुन याकामी प्रतिवादी क्र. २चे वारस सामिल करुन घेण्यासाठी वादीने निशाण ९८ येथे अर्ज दिला होता आणि त्यामध्ये तीन वारस नमुद केले होते. मात्र प्रतिवादीने आणाखी २ वारस असल्याबाबतचे कळविले आहे. सबब त्या वारसांना याकामी प्रतिवादी क्र. २ चे वारस म्हणुन सामिल करुन घ्यावे अशी मागणी वादी करत आहे.

२. या अर्जास प्रतिवादीने त्याचे निशाण १०४ वरील म्हणण्यावर भिस्त ठेवली असुन सदर म्हणण्यावर वादीने मुद्दामहुन प्रतिवादी क्र. २ याचे वारस दाव्यामध्ये सामिल करुन घेण्यास विलंब केला आहे असे नमुद केले आहे. तसेच प्रस्तावित वारस हे उभादांडा येथील असल्यामुळे वादीला इतका कालावधी कसा काय लागला याच्यावर प्रतिवदीने प्रश्न उभा केला आहे. एकंदरीत वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्याने केली आहे.

२. या परिस्थितीमध्ये यापूर्वीच निशाण ९८ वरील आदेश मंजूर करुन वादीने त्या अर्जामध्ये नमुद केलेले वारस दाव्याचे कामी सामिल करुन घ्याचे अशी मंजूरी देण्यात आलेली आहे. त्या अर्जाच्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे ज्याअर्थी त्या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ यांचा प्रतिदावा होता त्याअर्थी त्यांचे वारसांची देखील या दाव्यामध्ये अर्ज करुन वारस म्हणुन सामिल करुन घेण्याची तितकीच जबाबदारी होते असे मला वाटते. सबब ज्याअर्थी निशाण ९८ वरील अर्ज मंजूर करण्यात येईल त्याअर्थी या अर्जाबाबत मी खालील आदेश पारित करतो.

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अबेटमेंट रद्द बातल करुन विलंब क्षमापित करुन या अर्जात नमुद प्रतिवादी क्र. २ च्या वारसांना दाव्यामध्ये सामिल करुन घेण्यात येते.

सही/—

(वि.द.पाटील)

दिनांक— १४/०२/२०१८

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.